**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१०**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२४/११/२०११

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१० सोमवार दि.२८/११/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**सोमवार दिनांक- २८/११/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६१ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करणे. |
| ६२ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १४ मधील बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोड पासून (मुख्य जल वाहिनी ते साळवे नगरमध्ये १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे) या कामी होणा-या रक्कम रूपये ५,२१,९५२/-चे अतिरिक्त खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६३ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची लॅब टेक्नीशियन म्हणून कंत्राटी करार पध्दतीने दिनांक १५/११/२०११ पासून सहामहिने कालावधीसाठी केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- १] विषय क्र.६१- मा.स्थायी समिती सभा क्र.८ शनिवार दि.२९/१०/२०११ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत
२] विषय-क्रमांक- ६२ ते ६३ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**

विषय क्रमांक-६१ सोमवार दिनांक २८/११/२०११

ठराव क्रमांक-६१ सोमवार दिनांक २८/११/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुरः-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.
सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा. स्थायी समिती क्रमांक ८ शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- मागिल सभा दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा क्रमांक ८ शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ८ शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज सही /

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**

विषय क्रमांक-६२ सोमवार दिनांक २८/११/२०११

ठराव क्रमांक-६२ सोमवार दिनांक २८/११/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १४ मधील बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोड पासून (मुख्य जल वाहिनी ते साळवे नगरमध्ये १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे) या कामी होणा-या रक्कम रूपये ५,२१,९५२/-चे अतिरीक्त खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** पाणी पुरवठा जा.क्र. १०९३ दि१५/११/२०११

प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र. १४ मधील बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोडपासून (मुख्य जलवाहिनी ते साळवेनगर मध्ये १५० एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे) याकामी होणा-या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त साहेब यांची दि.८/११/२०११ रोजीची मान्यता

महोदय,

उपरोक्त विषयान्वये अहवाल सादर करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजना सन २००८-०९ अंतर्गत बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोडपासून (मुख्य जल वाहिनी ते साळवे नगरमध्ये १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे) चे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम निविदा रक्कम , अतिरिक्त होणारा खर्चा बाबत माहिती खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १] प्रशासकीय मान्यता रक्कम | -रू. २७,२३,१०६/- |
| २] तांत्रिक मान्यता रक्कम | - रू. २७,२३,१०६/- |
| ३] मंजुर निविदा रक्कम | - रू.२६,५९,७१०/- + ५% = २७,९२,६९५/- |
| ४] अतिरीक्त होणारा खर्च | - रू.५,२१,९५२/- |
| ५] अतिरीक्त खर्चासहित एकुण | - रू. ३३,१४,६४७.७५/- |

त्यानुसार सदर कामाकरिता अतिरीक्त खर्च रू.५,२१,९५२/- जादा खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेच्या मागासवर्गीय कल्याणकारी विकास योजनेअंतर्गत एकुण रू.२.१० कोटी रक्कमेची सन २०१०-११ या अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात आली आहे. सदरचे काम नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत असल्यामुळे मागासवर्गीय कल्याणकारी योजनेमधुन अतिरीक्त होणा-या रू.५,२१,९५२/- चा खर्च प्रस्तावीत करता येवु शकेल.

सदर कामी येणा-या अतिरीक्त खर्चास मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक १४ बोल्हेगांव मधील नगर - मनमाड रोडपासून मुख्य जलवाहिनी ते साळवेनगर मध्ये पाईप लाईप टाकणे कामीचे अतिरीक्त खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्टानुसार बोल्हेगांव प्रभाग क्रमांक १४ मधील पाईप लाईन टाकणे कामीचे मनपाचे मागासवर्गीय कल्याणकारी योजने मधून अतिरीक्त खर्चास मंजूरी देण्यांत यावी.

मा. सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १४ मधील नागरी दलित वस्ती सुधारणा योजना निधीमधून मंजूर असलेल्या बोल्हेगांव येथे नगर-मनमाड रोड पासून (मुख्य जल वाहिनी ते साळवे नगरमध्ये १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे) या कामी होणा-या रक्कम रूपये ५,२१,९५२/- (रूपये पांच लाख एकवीस हजार नउशे बावन्न फक्त) चे अतिरीक्त खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदरचा खर्च हा म.न.पा.च्या मागासवर्गीय कल्याणकारी निधीच्या तरतुदी मधून करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव. सही /

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**

| विषय क्रमांक-६३ | सोमवार दिनांक २८/११/२०११ |
|---|---|
| ठराव क्रमांक-६३ | सोमवार दिनांक २८/११/२०११ |

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची लॅब टेक्नीशियन म्हणून कंत्राटी करार पध्दतीने दिनांक १५/११/२०११ पासून सहामहिने कालावधीसाठी केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** आस्थापना विभाग दिनांक १७/११/२०११

प्रस्तावना-विषय- रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

सादर,

कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र. ६० दिनांक २५/१०/११ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागातील मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र.आस्थापना ३०४ दिनांक २/५/२०११ अन्वये दिनांक ३/५/२०११ ते २/११/२०११ या ६ महिन्याच्या कालावधी मध्ये रक्तपेढी विभागा संबंधी असणारे काम समाधानकारक असुन पुढील कालावधीसाठी खंड देवुन पुर्नेनेमणुक आदेश देणे बाबत" नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग येथे मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र. आस्था / कंत्राटी करार नेमणुक २३४१ दिनांक ११/११/२०११ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारा नुसार दरमहा रूपये १३,०००/-(अक्षरी रू. तेरा हजार मात्र) या मानधनावर दिनांक १५/११/२०११ पासून सहा महिन्याच्या कालावधी करीता केलेल्या करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता लॅब टेक्शीशियन म्हणून मोरे पल्लवी दगडू यांचे केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची लॅब टेक्नीशियन म्हणून कंत्राटी करार पध्दतीने दरमहा रूपये १३,०००/-(अक्षरी रू. तेरा हजार मात्र) या मानधनावर दिनांक १५/११/२०११ पासून सहामहिने कालावधीसाठी केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका